# संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

## लिडकॉम

## महामंडळा मार्फत राबविण्यात येत असलेल्या योजना

**१. ५० टक्के अनुदान योजना :-**

दरिद्र्य रेषेखालील कुटुंबातील व्यक्तींना राष्ट्रीयकृत बँकेमार्फत रु. ५०,००० /- पर्यंत प्रकल्प गुंतवणूक असणाऱ्या व्यवसायासाठी सवलतीच्या दराने अर्थसहाय्य दिले जाते. या अर्थ सहाय्यापैकी रु. १०,०००/- कमाल मर्यादेपर्यंत ५० टक्के कर्जाची रक्कम महामंडळ अनुदान म्हणून देते. उर्वरित ५० टक्के कर्जाची परतफेड ३६ ते ६० समान मासिक हप्त्यांत अथवा बँकेने ठरवून दिलेल्या हप्त्यांत बँकेकडे करावी लागते. बँकेकडून या योजनेखाली मिळणाऱ्या कर्जावर द. सा. द. शे. ९.५ ते १२.५. टक्के दराने व्याज आकारले जाते.

**२. बीज भांडवल योजना :-**

रु. ५०,०००/- ते रु. ५,००,०००/- पर्यंत प्रकल्प गुंतवणूक असणाऱ्या कोणत्याही योजनेसाठी बीज भांडवल योजनेअंतर्गत राष्ट्रीयकृत बँकेमार्फत कर्ज पुरवठा सवलतीच्या दराने उपलब्ध करण्यात येतो. या योजनेअंतर्गत रु. ५०,०००/- पासून ते रु. ५,००,०००/- पर्यंतचा कर्जपुरवठा द. सा. द. शे. ९.५ ते १२.५ टक्के व्याज दराने बँकेमार्फत करण्यात येते. या योजनेअंतर्गत बँकेने मंजूर केलेल्या कर्ज रकमेपैकी ७५ टक्के कर्ज रक्कम ही राष्ट्रीयकृत बँकेमार्फत देण्यात येते. ५ टक्के रक्कम ही लाभार्थ्यांने स्वत:चा सहभाग म्हणून बँकेकडे जमा करावयाची असते. उर्वरित २० टक्के रक्कम ही महामंडळ बीज कर्ज म्हणून देते. त्या रकमेपैकी रु. १०,०००/- अनुदान म्हणून देण्यात येतात तर उर्वरित रक्कम ही ४ टक्के या व्याजदराने बीज कर्ज म्हणून देण्यात येते. या योजनेअंतर्गत मिळणाऱ्या कर्जाची परतफेड ही राष्ट्रीयकृत बँकेस व महामंडळास ३६ ते ६० समान मासिक हप्त्यांत एकाचवेळी करावयाची असते.

**५० टक्के अनुदान योजना व बीज भांडवल योजना सर्वसाधारण अटी व नियम :-**

१. अर्जदार हा अनुसूचित जातीतील चर्मकार समाजाचा असावा.

२. अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा जास्त व ५० वर्षापेक्षा कमी असावे.

३. अर्जदार दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील असावा व त्याच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ग्रामिण भागासाठी रु. ३९,३०८/- व शहरी भागसाठी रु. ५४,४९६/- यापेक्षा जास्त असू नये. अर्जदारास तो करु इच्छिणाऱ्या व्यवसायाचे ज्ञान असावयास हवे. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा कायम रहिवासी असावा. अर्जदाराने अन्य शासकीय संस्थांकडून अनुदान घेतलेले नसावे व तो कोणत्याही संस्थेचा थकबाकीदार नसावा. अर्जदाराने सादर केलेला जातीचा व उत्पन्नाचा दाखला सक्षम अधिकाऱ्याने दिलेला असावा.

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :-**

१) अर्जदाराचा शैक्षणिक दाखला, २) उत्पन्नाचा दाखला, ३) जातीचा दाखला, ४) नुकताच काढलेला पासपोर्ट

साईजचा फोटो, ५) रेशनकार्डची झेरॉक्स प्रत, ६) व्यवसायासाठी लागणाऱ्या स्थावर मालमत्तेच्या किंमतीचे दरपत्रक, ७) अर्जदारास ज्या ठिकाणी व्यवसाय करावयाचा असेल त्या जागेच्या उपलब्धतेचा पुरावा किंवा भाड्याचे करारपत्र, ८) अर्जदारास व्यवसाय करण्यासाठी ग्रामपंचायत, नगरपालिका अथवा महानगरपालिकेचा 'ना हरकत' परवाना अथवा दुकाने अधिनियमाखालील परवाना ( बीज भांडवल कर्ज मागणीसाठी), ९) प्रकल्प अहवाल (बीज भांडवल कर्ज मागणीसाठी), १०) दोन शासकीय / निमशासकीय, जामिनदार, जामीनदारांच्या कार्यालयाचे हमीपत्र, जामिनदारांचे प्रतिज्ञापत्र (बीज भांडवल कर्ज मागणीसाठी).

**३. प्रशिक्षण योजना :-**

चर्मकार समाजाच्या लाभधारकांना व्यावसायासाठी लागणारे तांत्रिक कोशल्य प्राप्त करण्यासाठी व संबंधित तांत्रिक व्यवसाय सुरू करण्यासाठी विविध व्यावसायिक ट्रेडचे शासन मान्यताप्राप्त संस्थेमार्फत ( ३ ते ६ महिन्यापर्यंत ) मोफत प्रशिक्षण देण्यात येते.

१. शिवणकला
२. ब्युटीपार्लर
३. इलेक्ट्रीक वायरमन
४. टर्नर / फिटर
५. मशीनवर स्वेटर विणणे
६. खेळणी बनविणे
७. टी. व्ही/ रेडिओ / टेपरेकॉर्डर मेकॅनिक
८. संगणक प्रशिक्षण
९. मोटार वाईन्डींग
१०. फेब्रीकेटर / वेल्डींग
११. ऑटोमोबाईल रिपेअरींग (टु व्हीलर, थ्री व्हीलर, फोर व्हीलर)
१२. वाहनचालक (मोटार ड्रायव्हिंग )
१३. चर्मोघोग पादत्राण उत्पादन
१४. चर्मोघोग चर्मवस्तू उत्पादन

**प्रशिक्षणार्थी निवडीच्या अटी :-**

१. अर्जदार हा अनुसूचित जातीतील चर्मकार समाजाचा असावा.
२. अर्जदाराचे शिक्षण हे देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाकरिता पुरेसे असावे.
३. अर्जदार १८ ते ४० या वयोगटातील असावा.
४. प्रशिक्षण योजनेच्या संदर्भात बेरोजगारांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षण योजनेमध्ये कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे दारिद्र्य रेषेखाली असावे.
५. अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवाशी असला पाहिजे.

**प्रशिक्षणार्थीला अर्जासोबत सादर करावे लागणारी कागदपत्रे**

१. जातीचा दाखला
२. उत्पन्नाचा दाखला
३. अर्जदार यांचा फोटो
४. रेशन कार्ड किंवा निवडणूक आयोगने दिलेले ओळखपत्र
५. शाळा सोडल्याचा दाखला

**विद्यावेतन :-**

मोफत प्रशिक्षणाव्यतिरिक्त प्रशिक्षणार्थीस दरमहा रु. १५०/- ते ३००/- पर्यंत विद्यावेतन देण्यात येते.

## ४. राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ (NSFDC), नवी दिल्ली यांच्या योजना :

महामंडळामार्फत, राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ (NSFDC), नवी दिल्ली या महामंडळाच्या केन्द्र पुरस्कृत योजनांचा लाभ अनुसूचित जातीतील चर्मकार समाजाच्या लाभार्थ्यांना देण्यात येतो. या अंतर्गत चर्मकार समाजाच्या लोकांना त्यांनी निवडलेल्या कोणत्याही स्वयं-रोजगारासाठी खालीलप्रमाणे कर्ज देण्यात येते-

### १. मुदती कर्ज सहाय्यता :-

**अ. उद्योगाची लागत :**

राष्ट्रीय अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती वित्त आणि विकास महामंडळ हे रु. ५ लाख लागत असलेल्या योजनांना / उघोगांना मुदती कर्ज सहायता देते.

**ब. सहायतेचे प्रमाण :**

राष्ट्रीय अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती वित्त आणि विकास महामंडळ, उद्योगाच्या लागत किंमतीच्या ९० टक्के मुदती कर्ज देऊ शकते. त्याचबरोबर राज्यस्तरीय महामंडळाने कर्ज व आवश्यक अनुदान दिल्यानंतर व अन्य वित्तीय सहायता मिळविल्यानंतर, वरील सहायता महामंळाकडून देण्यात येते.

**क. उघोजकाचे भांडवल :**

| उघोग/ योजनेची लागत | उघोगाच्या लागतीच्या टक्केवारीत उघोजकाचे कमीत कमी भांडवल |
|---|---|
| १. रु. १,००,०००/- लागत असलेल्या उद्योगासाठी | नाही |
| २. रु. १,००,०००/- ते रु. २,५०,०००/- लागत असलेला उद्योग | २ टक्के |
| ३. रु. २,५०.०००/- ते रु. ५,००.०००/- लागत असलेला उद्योग | ३ टक्के |
| ४. रु. ५,००.०००/- पेक्षा जास्त लागत असलेला उद्योग | ५ टक्के |

ड. व्याजाचा दर :-

| प्रति उद्योग कर्जाची रक्कम (राष्ट्रीय अनु. जाती/ अनु. जमाती महामंडळाचा हिस्सा) | वार्षिक व्याजाचा दर राज्य स्तरांवरील महामंडळासाठी | व्याजाचा दर ज्यांना कर्ज दिले जाते त्यांच्यासाठी |
|---|---|---|
| अ. रु. ५,००.००० पर्यंत | ४ टक्के | ७ टक्के |
| आ. रु. ५,००.००० पेक्षा जास्त | ६ टक्के | ९ टक्के |

वरील व्याजाचे दर तक्त्यानुरूप नाहीत.

ई. कर्ज परत करण्याचा कालावधी :-

मुदती कर्ज तिमाही / सहामाही हप्त्यांमध्ये जास्तीत जास्त विलंबासह ५ वर्षाच्या कालावधीत परत करावे लागते.

**कर्ज प्रस्तावासोबत जोडावयाची कागदपत्रे :-**

१. तहसिलदार यांनी दिलेला जातीचा दाखला

२. तहसिलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला
शहरी विभागाकरिता वार्षिक उत्पन्न रु. ५५,०००/- चे आत व ग्रामिण विभागाकरिता वार्षिक उत्पन्न रु. ४०,०००/- चे आत

३. अर्जदार ज्या ठिकाणी व्यवसाय करणार आहे त्या व्यवसायास ग्रामपंचायत / नगरपालिका / महानगर पालिका यांचे ''ना हरकत'' प्रमाणपत्र

४. अर्जदार ज्या ठिकाणी व्यावसाय करणार आहे त्या जागेसंबंधी पुरावा.

५. प्रकल्प अहवाल

६. प्रस्तावित उद्योग / व्यवसायाकरिता आवश्यक परवाना

७. रेशनकार्डाची सत्यप्रत

८. अर्जदाराने यापूर्वी शासकीय योजनेतून कर्ज व अनुदान घेतले नाही, तसेच सदरचे कर्ज मंजूर झाल्यावर ते वेळेवर परतफेड करण्याचे हमीपत्र/ प्रतिज्ञापत्र रु. २०/- ५०/- स्टॅम्प पेपरवर नोटरी / ॲफीडेव्हीट सह.

९. अर्जदारास नोकरदार असलेल्या जामीनदाराच्या कार्यालयाकडून पगार कपातीचे हमीपत्र.

१०. अर्जदाराच्या शेतकरी / प्रॉपर्टीधारक जामीनदाराचे कर्ज फेडीबाबत ७/१२/प्रॉपर्टी कार्ड चा उतारा व त्यावर कर्जाचा बोजा चढविण्याचे व अर्जदाराने वेळेवर कर्ज न फेडल्यास ते फेडण्याबाबत रु. २०/- / ५०/-च्या स्टँप पेपरवर हमीपत्र नोटरीसह.

११. अर्जदारने कर्जाची परतफेड नियमित न केल्यास जामीनदार कर्जाची परतफेड करील याबाबत रू. २०/- / ५०/-च्या स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र नोटरीसह.

१२. अर्जदारास जो व्यवसाय करावयाचा आहे त्याबाबत तांत्रिक ज्ञानाचे प्रमाणपत्र .

१३. अर्जदारास व्यवसायाचा प्रत्यक्ष अनुभव असल्याचा पुरावा.

१४. शैक्षणिक दाखला.

१५. कच्च्यामालाचे कोटेशन.

## ५. सूक्ष्म पत पुरवठा योजना (NSFDC) :-

या योजनेअंतर्गत दारिद्र्य रेषेखालील चर्मकार समाजातील लाभार्थ्यांना ५ टक्के व्याज दराने रु. २५,०००/- पर्यंत अर्थ सहाय्य दिले जाते. या रकमेमध्ये ५० टक्के किंवा रु. १०,०००/- यापैकी जे कमी असेल तेवढे अनुदान दिले जाते व उर्वरित रक्कम कर्ज म्हणून दिली जाते.

**अटी :**

१. सूक्ष्म पत पुरवठा योजनेअंतर्गत लाभार्थींना पूर्ण कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर विभागीय अधिकाऱ्यांनी उद्दिष्टानुसार मंजुरा द्यावयाची आहे.

२. कर्जाचा व्याजाचा दर द. सा. द. शे. ५% असून त्याची वसूली ३६ समान हप्त्यांमध्ये करण्यात येईल.

३. लाभार्थीकडून एक सक्षम जामिनदार घेण्यात यावा.

४. एकूण उद्दिष्टांपैकी ५०% कर्ज प्रस्ताव, कृषी व कृषीवर आधारित व्यवसायाकरिता, ४०% सेवेकरिता व १०% कारखानदारीवर आधारित व्यवसायांच्या कर्ज प्रस्तावांना मंजूरी देण्यात येते.

५. कर्ज मंजुरीची मर्यादा रू. २५,०००/- पेक्षा जास्त नाही.

६. सदर योजनेत १००% वसूलीचा जबाबदारी विभागीय अधिकारी व जिल्हा व्यवस्थापकावर राहील.

**कर्ज मंजुरीचे निकष :-**

१. चर्मकार समाजातील निराधार व गरीब व गरजू लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात यावे.

२. ज्या गावात राष्ट्रीयकृत बँका नाहीत अशा गावातील लाभार्थींना कर्ज मंजुरी देताना निवड करण्यात यावी.

३. बीजभांडवल, एनएसएफडीसी योजनेअंतर्गत ज्या गावातील लाभार्थींना फायदा मिळाला नाही अशा गावातील लाभार्थींना प्राधान्य देण्यात यावे.

४. व्यवसायासाठी अत्यंत गरजवंत लाभार्थींची निवड व शिफारस करण्याचे अधिकार जिल्हा व्यवस्थापक यांना देण्यात येत आहेत .

५. महामंडळाच्या योजनेतून प्रशिक्षण घेतले असल्यास त्या लाभार्थींना प्राधान्य देण्यात यावे.

ज्या लाभार्थींनी यापूर्वी योजनेचा लाभ घेतलेला असल्यास त्यांना पुन्हा सदर योजनेचा लाभ देण्यात येऊ

## ६. महिला समृध्दी योजना (NSFDC)

चर्मकार समाजातील विधवा, परित्यक्ता महिला अथवा ज्या गावात राष्ट्रीयकृत बँका नाही अशा गावातील महिला लाभार्थींसाठी महिला समृद्धी योजनेअंतर्गत कर्ज रक्कम रु.१५,०००/- व अनुदान रु. १०,०००/- असे दोन्ही मिळून रु. २५,०००/- पर्यंत ४ टक्के व्याज दराने कर्ज देण्यात येते.

**अटी :-**

१. महिला समृद्धी योजनेअंतर्गत महिला लाभार्थींनी पूर्ण कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर मंजूरी देण्यात येईल.

२. कर्जाचा व्याजाचा दर. द. सा. द. शे. ४% असून त्याची वसूली ३६ समान हप्त्यांमध्ये करण्यात येईल.

३. लाभार्थीकडून एक सक्षम जामिनदार घेण्यात येईल.

४. सदर योजनेअंतर्गत १००% महिला लाभार्थींनाच लाभ द्यावयाचा आहे. त्यामध्ये प्रामुख्याने विधवा व परित्यक्ता यांनाच प्राधान्य देण्यात येईल.

५. एकूण उद्दिष्टांपैकी ५०% कर्ज प्रस्ताव कृषी व कृषीवर आधारित व्यवसायासाठी, ४०% सेवेकरिता व १०% कारखानदारीवर आधारित व्यवसायांच्या कर्ज प्रस्तावांना मंजूरी देण्यात येईल.

६. कर्ज मंजुरीची मर्यादा रु. २५,०००/- पेक्षा जास्त नसेल.

**कर्ज मंजुरीचे निकष :-**

१. चर्मकार समाजातील विधवा, परित्यक्ता महिलांना प्राधान्य देण्यात येईल.

२. ज्या गावात राष्ट्रीयकृत बँका नाहीत अशा गावातील महिला लाभार्थींची कर्ज मंजुरी देताना निवड करण्यात येईल.

३. बीजभांडवल, एनएसएफडीसी योजनेअंतर्गत ज्या गावातील महिला लाभार्थींना फायदा मिळाला नाही अशा गावातील लाभार्थींना प्राधान्य देण्यात येईल.

४. व्यवसायासाठी अत्यंत गरजवंत महिला लाभार्थींची निवड व शिफारस करण्याचे अधिकार जिल्हा व्यवस्थापक यांना देण्यात येत आहेत .

५. महामंडळाच्या योजनेतून प्रशिक्षण घेतले त्या लाभार्थींना प्राधान्य देण्यात येईल.

६. **सदर योजनेअंतर्गत १००% महिला लाभार्थींनाच लाभ देण्यात येईल .**

ज्या लाभार्थींनी यापूर्वी योजनेचा लाभ घेतलेला असल्यास त्यांना पुन्हा सदर योजनेचा लाभ देण्यात येणार नाही.

**लाभार्थ्यांची पात्रता :**

१. अर्जदार हा अनुसूचित जातीतील चर्मकार समाजाचा असावा.

२. अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवाशी असावा.

३. अर्जदार वय १८ ते ५५ वर्षे असावे.

४. अर्जदार महामंडळाचा, बँकेचा अथवा कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा.

५. ग्रामिण भागातील अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न रु. ३९,३०८/- आणि शहरी भागातील अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न रु. ५४,४९४/- यापेक्षा जास्त नसावे.

६. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ घेता येईल.

**वरील योजना स्वयंसेवी संस्था (N.G.O.) मार्फत राबविण्यात येतात.**

सदर योजना एन. जी. ओ. मार्फत राबवू शकता.

एन. जी. ओ. यांनी सादर करावयाच्या अर्जासोबत खालील कागदपत्र जोडलेले असावेत.

१. संस्था ही धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणी झालेला असावी. त्यांचेकडून मिळालेले नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडावी.

२. संस्थेच्या नियमावलीमध्ये संस्था आपल्या सभासदांना कर्ज देऊ शकेल व वसूली करेल अशा प्रकारची नोंद असावी किंवा तशी नोंद नसल्यास तशी परवानगी धर्मदाय आयुक्ताकडून मिळालेला असावी.

३. अर्जसोबत मागील ३ वर्षाचे ऑडीट स्टेटमेंट असावे.

४. प्रत्येक संस्थेला सुरूवातीला जास्तीत जास्त २० लाभार्थ्यांसाठी मान्यता देण्यात येईल.

५. संस्थेच्या अर्जासोबतच संभाव्य लाभार्थ्यांचे अर्ज महामंडळाच्या नेहमीच्या नमुन्यात जोडलेले असावे. प्रत्येकाचा वैयक्तिक अर्ज असावा. तसेच अर्जासोबत जात, उत्पन्न, फोटोग्राफ, इत्यादी आवश्यक प्रती जोडलेल्या असाव्यात. प्रत्येकाच्या अर्जासोबत हमीपत्र व जामीनदारांची वैधानिक कागदपत्र यांची आवश्यकता नाही.

६. अर्जदार सभासद संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे थकबाकीदार नसावेत याची खात्री जिल्हा व्यवस्थापक यांनी करावी.

७. संस्थेला महामंडळाकडून मिळालेल्या निधीचा वेगळा हिशोब द्यावा लागेल, तसेच आवश्यक रेकॉर्ड कोणत्याही वेळेस तपासण्याचा महामंडळास अधिकार राहील.

**टिप :** संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे माहिती पुस्तकातून समाज बांधवांचे माहितीसाठी प्रकाशित करण्यात आली आहे.

**मुख्य कार्यालय पत्ता :** बॉम्बे लाईफ बिल्डींग, ५ वा मजला, वीर नरिमन मार्ग, मुंबई - ४०० ००१.

**दूरध्वनी : २२०४७१५७, २२०४४१८४, फॅक्स : (०२२) २२८३५८८१**